REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर राबविल्या जाणा-या मूल्यमापन पध्दतीचा अभ्यास



श्रीमती शशिकला दोधू सोनवणे [१] , डॉ. कविता सुरेश साळुखे [२]
[१] संशोधक , विद्यावाचस्पती विद्यार्थी ,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगांव.
[२]मार्गदर्शक, यंशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ , नाशिक.

## सारांश

दर्जेदार आणि विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास साधण्यासाठी परिणामकारक अध्यापन-अध्ययन कृती घडवून आणणे शिक्षणामध्ये अत्यंत आवश्यक असल्याने त्या दृष्टीने वाटचाल व्हावी यासाठी योग्य पध्दतीने मूल्यमापन होणे खूप महत्वाचे आहे. ज्या विद्यार्थ्यांचा विकास घडवून आणावयाचा त्यांच्यावर कोणते पूर्व-संस्कार आहेत याचा मागोवा घेणे म्हणजेच संस्काराच्या दृष्टीने त्यांची पूर्व-पीठीका अजमाविणे होय. यामूळे विद्यार्थ्यांचा वर्तन-विकास कितपत झालेला आहे याचा अंदाज येवून त्यांच्या सर्वागीण विकासासाठी आखणी करण्यासाठी कोणते वर्तनबदल घडवून आणणे आवश्यक आहे हे ठरविणे शक्य होते आणि हे मूल्यमापनातून शक्य आहे. आज शिक्षण प्रक्रियेतील मूल्यमापन पध्दतीत मोठया प्रमाणावर बदल होत आहेत. म्हणून संशोधकाने सदर संशोधनात प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील मूल्यमापन पध्दतीचा अभ्यास केलेला आहे. सदर संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे. प्राप्त माहीतीचे विश्लेषण करण्यासाठी केंद्रीय प्रवृत्ती तसेच विचलनशिलतेची परीमाणे व टी परीक्षिकेचा वापर करण्यात आला होता. संशोधन नमुन्यात प्राथमिक स्तरावरील **२०१** आणि उच्च प्राथमिक स्तरावरील **१९७** शिक्षकांचा समावेश करण्यात आला होता. संशोधनांती असे आढळून आले की, इयत्ता ४ ला अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक आढळून आला नाही तसेच खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक आढळून आला नाही.

## प्रस्तावना

डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय शिक्षण आयोगाने (१९६४-६६) महात्मा गांधींच्या शैक्षणिक विचारांच्या पार्श्वभूमीवर आणि बदलत्या सामाजिक - राजकीय संदर्भात राष्ट्रीय एकात्मतेचे भान दिले. समतेच्या पायावर नवीन लोकशाही राज्यासाठी हव्या असणाऱ्या शिक्षणव्यवस्थेबाबत तपशिलाने मार्गदर्शन केले. या आयोगांच्या शिफारशींचा विचार करुन भारताचे पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९६८) निश्‍चित करण्यात आले. त्यानुसार देशभरात शालेय शिक्षणाची समान स्तररचना करण्यात आली. याप्रकारे शालेय राष्ट्रीय स्तरावर एकसुत्री स्वरुप आणत असतांनाच विविध राज्यांच्या स्थानिक गरजांचा, आकांक्षांचा आणि प्रश्‍नांचा विचार करणेही महत्वाचे होते. १९७६ मध्ये संविधानात केलेल्या दुरुस्तीनुसार शिक्षण हा फक्त राज्यांच्या अखत्यारितील विषय न राहता त्याचा सामाईक सूचीत समावेश करण्यात आला.

१९९२ मध्ये या धोरणाच्या मसुदयात सुधारणा झाली आणि धोरणातील उद्दीष्टे प्रत्याक्षात आणण्याच्या दृष्टीने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी एक सुस्पष्ट कृतिकार्यक्रमही (१९९२) तयार झाला. यानंतर ‘किमान अध्ययन क्षमता विकास ’कार्यक्रमाचे आणि प्रा. यशपाल यांच्या ‘ओझ्यावीना शिक्षण’ अहवालाले (१९९३) शालेय शिक्षणाचा आशय आणि उपयुक्तता या प्रश्नांना थेट हात घातला.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा (१९८८) तयार करण्यात आला. त्याचा फेरआढावा घेण्यात आला व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० प्रसिध्द करण्यात आला. तद्नंतर पाच वर्षामध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ जाहीर करण्यात आला आहे. २००५ च्या आरखड्यामागे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही संदर्भ आहेत. जागतिकीकरणाच्या आजच्या युगात मनुष्यबळ ही देशाची संपत्ती आहे. मनुष्यबळ विकसनातून देशविदेशातील अनेक अपूर्व संधी आपल्या देशातील तरुणांपुढे उभ्या आहेत. मात्र शिक्षणाच्या माध्यमातून या मनुष्यबळाचे ज्ञानात्मक आणि कौशल्यात्मक मूल्य वाढवल्याशिवाय या संधीचा पुरेपुर लाभ त्यांना मिळणार नाही भारतातील तरुण पिढीचे शिक्षण या विषयाला आज जागतिक महत्व आहे. त्यामुळे शिक्षणविषयक दृष्टीकोनात, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत वेगाने बदल घडवणे आणि त्याच वेळी राष्ट्रीय, संविधानात्मक, स्थानिक आणि व्यक्तिगत मूल्यांची

जपणूक करणे असे दुपदरी कार्य करण्याची निकड निर्माण झाली आहे. ही निकड राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या विविध प्रकरणांतून स्पष्ट करण्यात आली आहे.

शिक्षणविषयक ग्रंथामध्ये, चर्चामध्ये स्नेहपूर्ण, विद्यार्थीकेंद्रीत, कृतिप्रधान शिक्षणाची संकल्पना यापूर्वी मांडली गेली असली तरी वास्तवात मात्र ती थोडक्या प्रमाणात अमलात आल्याचे दिसत आहे. आता मात्र बालकांच्या शिक्षण हक्का कायद्यान्वये 'प्रत्यक्षातील अनिवार्य जबाबदारी' या स्वरुपात ही संकल्पना मांडली आहे. तसेच बालकांच्या शिक्षण हक्का कायद्यानुसार महाराष्ट्रात २० ऑगस्ट २०१० पासून इयत्ता १ ली ते ८ वी साठी सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आली आहे.

## संबंधीत साहित्याचा आढावा:

**क पुर रेखाराणी (२०१३) यांनी** सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनातच्या अमलबजावणीत येणाऱ्या शिक्षकांच्या अडचणींचा अभ्यास केला. प्रकल्प सादर करण्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी ३० माध्यमिक शिक्षक, ३० विद्यार्थी , ३० पालक यांच्याकडून माहिती संकलित केली यामध्ये शिक्षकांना अमलबजावणीत अडचणी येतात तसेच विद्यार्थ्यांना प्रकल्प सादर करण्यात समस्या येतात पालकांच्या मनात याविषयी गैरसमज आहेत. असे आढळून आले.

**प्रा.जदाल.एम.एम. ( २०११)** प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौशल्य प्राप्तीमध्ये सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाचा प्रभाव या संदर्भात संशोधन केले. त्यांना असे आढळून आले की, सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाच्या माध्यमातून विविध कौशल्यावर प्रभुत्व प्राप्त करणे शक्य आहे, चाचणी व तोंडी परीक्षा विद्यार्थ्यांना विविध कौशल्यावर प्रभुत्व प्राप्त करण्यासाठी शिक्षक जास्तीत जास्त संधी प्राप्त करून देतात, सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभिरूची, लक्ष केंद्रित करणे व अध्ययनाची सवय निर्माण होते.

**पाटील प्रतिभा (२०१२)** यांनी सातत्य पूर्ण मूल्यमापनाच्या उपयुक्ततेचा अभ्यास या विषयावर संशोधन केले, त्यांना असे आढळून आले की, शिक्षकांना प्रशिक्षण मिळालेले नाही, मिळालेले प्रशिक्षण पर्याप्त नाही, अशैक्षणिक कामाचा मूल्यमापनावर परिणाम होतो तसेच मूल्यमापनात शिक्षकांना समस्या येतात असे आढळून आले.

## संशोधनाची गरज

प्रस्तुत संशोधन हे मूल्यमापन प्रक्रियेशी संबंधित आहे. मूल्यमापनासाठी स्विकारलेली सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने क्रांतीकारी ठरणार आहे. या मूल्यमापन पध्दतीतील आकारिक मूल्यमापन हे महत्वपूर्ण मूल्यमापन आहे. ज्यात आठ साधन तंत्राचा विचार केलेला आहे. प्रस्तुत संशोधनात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाविषयी शिक्षकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

प्राथमिक शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण हक्काच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मूल्यमापन पध्दती सुयोग्य पध्दतीने राबविण्यासाठी शासनाने मार्गदर्शिका काढणे, प्रशिक्षण घेणे ही महत्त्वपूर्ण कार्य गांभिर्याने पार पाडलेली आहे. त्यातून या विषयावर सखोल माहिती पूरविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्यक्षात शाळेत त्याबाबत शिक्षकांनी नेमकी कशी भूमिका स्विकारलेली आहे? आठ साधन तंत्रांची निवड केवळ उपचार तर ठरत नाही ना? म्हणून यांची धुरा सांभाळण्याचा शिक्षकांच्या आकारिक मूल्यमापना अंतर्गत आठही साधनांचा प्रत्यक्ष वापर कसा होतो याचा अभ्यास होणे गरजेचे वाटते. त्यादृष्टीने या संशोधन विषयाचे वेगळेपण आहे आणि महत्वाचे पण आहे.

## संशोधनाची चले

१. मूल्यमापन जाणिव.
२. सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापन वापराबाबतचा दृष्टिकोन.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
२. प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
३. उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
४. उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.

## परिकल्पना

१. प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.

२. प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.

३. उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.

४. उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.

## गृहितके

१) महाराष्ट्र शासनाने सर्व शाळांमध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती लागू केली आहे.
२) विद्यार्थी ज्ञानाचा रचयिता स्वतः असतो.
३) आकारिक मूल्यमापन पध्दती ही श्रेणींवर आधारीत पध्दती आहे.
४) आकारिक मूल्यमापना अंतर्गत आठ साधन तंत्राचा प्रत्यक्षात वापर करतांना शिक्षकांना अडथळे येतात.
५) आकारिक मूल्यमापनातून विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेच्या सुप्त गुणांचा मागोवा घेता येतो.
६) प्राथामिक व उच्च प्राथमिक स्तरावर मूल्यमापन करतांना लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तिन्ही प्रकारात मूल्यमापन साधनांचा उपयोग केला जातो.

## संशोधन पध्दती

सदर संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधित असून सदर संशोधनात प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील शिक्षकांच्या सर्वकष मूल्यमापन पध्दतीच्या जाणिवेचा अभ्यास करण्यात आला आहे. म्हणून सदर संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे.

## संशेधनाचा न्यादर्श

संशोधन नमुन्यात, प्राथमिक स्तरावरील **२०१** शिक्षकांचा समावेश करण्यात आला होता यात १२५ पुरुष शिक्षक व ७६ महिला शिक्षक तसेच खाजगी अनुदानित शाळेतील २९ शिक्षक व जि.प. शाळेतील १७२ शिक्षकांचा समावेश होता.

तसेच उच्च प्राथमिक स्तरावरील **१९७** शिक्षकांचा समावेश करण्यात आला होता, यात १४३ पुरुष शिक्षक व ५४ महिला शिक्षक तसेच खाजगी अनुदानित शाळेतील ८१ शिक्षक व जि.प. शाळेतील ११६ शिक्षकांचा समावेश होता.

## माहितीचे विश्लेषण


**सारणी क्रमांक ०१**

**इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी ला अध्यापन करणा-या शिक्षकांची सी.सी.ई. च्या जाणिवेची केंद्रीय प्रवृत्ती व विचलनशिलता**


| चल | स्तर | नमुना | मध्यमान | मध्यांक | बहुलक | प्र.वि. | विषमितता | शिखरदोष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सी.सी.ई. ची जाणिव. (इ.४ थी) | पुरुष शिक्षक | १२५ | २०.८६ | २१ | २० | ३.५८ | -०.८९ | १.६३ |
| | महिला शिक्षक | ७६ | २१.८६ | २२ | २२ | ३.५० | -.१.५७ | ५.४६ |
| सी.सी.ई. ची जाणिव. (इ.४ थी) | खाजगी अनुदानित शिक्षक | २९ | २०.१७ | २० | २० | ४.०० | -१.४३ | ४.६४ |
| | जि.प. शाळेतील शिक्षक | १७२ | २१.४२ | २२ | २३ | ३.४८ | -१.०१ | २.१० |
| सी.सी.ई. ची जाणिव. (इ.७ वी) | पुरुष शिक्षक | ५४ | २१.०० | २२ | २२ | ३.५३ | -०.५२ | ०.२३ |
| | महिला शिक्षक | १४३ | २०.५२ | २१ | २० | ३.८५ | -०.३० | -०.०९ |
| सी.सी.ई. ची जाणिव. (इ.७ वी) | खाजगी अनुदानित शिक्षक | ८१ | १९.८० | २०.०० | २२ | ३.७४ | -०.३२ | -०.१८ |
| | जि.प. शाळेतील शिक्षक | ११६ | २१.२५ | २१.५० | २२ | ३.६८ | -०.४० | -०.४० |

वरील सारणी क्रमांक ०१ मध्ये इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी ला अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक, खाजगी अनुदानित शिक्षक व जि.प. शाळेतील शिक्षक यांच्या सी.सी.ई. च्या जाणिवेची केंद्रीय प्रवृत्ती व विचलनशिलता दिलेली आहे. शिखरदोषाचे धन मूल्य हे प्रसामान्य संभव वक्राच्या तुलनेत वितरण उच्चशिखरी असल्याचे दर्शविते. तर शिखरदोषाचे ऋण मूल्य हे प्रसामान्य संभव वक्राच्या तुलनेत वितरण चर्पटकशिखरी असल्याचे दर्शविते. आलेख क्रमांक १ व २ मध्ये इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी ला अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक, खाजगी अनुदानित शिक्षक व जि.प.शाळेतील शिक्षक यांच्या सी.सी.ई.च्या जाणिवेची मध्यमानांची तुलना दर्शविली आहे.

**आलेख क्रमांक ०१**
**इयत्ता ४ ला अध्यापन करणा-या शिक्षकांच्या सी.सी.ई. च्या जाणिवेच्या मध्यमानाचा आलेख**




**आलेख क्रमांक ०२**
**इयत्ता ७ वी ला अध्यापन करणा-या शिक्षकांच्या सी.सी.ई. च्या जाणिवेच्या मध्यमानाचा आलेख**



### अनुमानात्मक विश्लेषण

### परीकल्पनांचे विश्लेषण

१. प्राथमिक स्तरावर (इयत्ता ४ थी) अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
२. प्राथमिक स्तरावर (इयत्ता ४ थी) अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
३. उच्च प्राथमिक स्तरावर (इयत्ता ७ वी) अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
४. उच्च प्राथमिक स्तरावर (इयत्ता ७ वी) अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.

**सारणी क्रमांक ०२**

**इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी ला अध्यापन करणा-या शिक्षकांची सी.सी.ई. च्या जाणिवेची तुलना**

| अ.क्र | चल | गट | नमुना | स्वा. मात्रा | मध्यमान | प्र.वि. | टी. मूल्य | पी. मूल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सी.सी.ई. ची जाणिव. (इ.४ थी) | पुरुष शिक्षक | १२५ | १९९ | २०.८६ | ३.५८ | १.९४ | ०.०५ | लक्षणिय फरक नाही |
| | | महिला शिक्षक | ७६ | | २१.८६ | ३.५० | | | |
| 2 | सी.सी.ई. ची जाणिव. (इ.४ थी) | खाजगी अनुदानित शिक्षक | २९ | १९९ | २०.१७ | ४.०० | १.७५ | ०.०८ | लक्षणिय फरक नाही |
| | | जि.प. शाळेतील शिक्षक | १७२ | | २१.४२ | ३.४८ | | | |
| 3 | सी.सी.ई. ची जाणिव. (इ.७ वी) | पुरुष शिक्षक | ५४ | १९५ | २१.०० | ३.५३ | ०.७८ | ०.४३ | लक्षणिय फरक नाही |
| | | महिला शिक्षक | १४३ | | २०.५२ | ३.८५ | | | |
| 4 | सी.सी.ई. ची जाणिव. (इ.७ वी) | खाजगी अनुदानित शिक्षक | ८१ | १९५ | १९.८० | ३.७४ | २.६९ | ०.००७ | ०.०१ स्तरावर लक्षणिय फरक आहे |
| | | जि.प. शाळेतील शिक्षक | ११६ | | २१.२५ | ३.६८ | | | |

### संशोधनाचे निष्कर्ष

१. प्राथमिक स्तरावर (इयत्ता ४ थी) अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यात सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
२. प्राथमिक स्तरावर (इयत्ता ४ थी) अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
३. उच्च प्राथमिक स्तरावर (इयत्ता ७ वी) अध्यापन करणा-या पुरुष शिक्षक व महिला शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.
४. उच्च प्राथमिक स्तरावर (इयत्ता ७ वी) अध्यापन करणा-या खाजगी अनुदानित व जिल्हा परीषद शाळेतील शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापनाच्या जाणिवेत लक्षणिय फरक नाही.

### संदर्भ ग्रंथ यादी

१. Buch, M.B. (1991). Fourth survey of Research in Education. Vol-2, New Delhi: NCERT.
२. पंडित वन्सीविहारी, (1997 शिक्षणातील संशोधन', पुणे : नुतन प्रकाशन, प्रथमावृत्ती

LBP PUBLICATION

३. दांडेकर वा□ना□ (2004□शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र', पुणे : श्रीविद्या प्रकाशन, सहावी आवृत्ती□
४. NCERT, (2006). Sixth survey of Educational Research. Vol-1, (1993-2000).
५. Chitale. R, (2010). Statistical and Quantitative Methods, (7thed.) Pune: Nirali Prakashan.
६. बालकाचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९
७. भाळवणकर वा-गो- - शैक्षणिक मूल्यमापन (नोव्हेंबर २००५) सुविचार प्रकाशन.
८. महाराष्ट्र बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियमावली २०११
९. सातत्यपुर्ण सर्वाकंष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका भाग १,२,३,४
१०. कुंडले म. बा. (सं.पा.) (जुन २०१०) मूल्यमापन पध्दती शिक्षण समीक्षा नागपूर, नारायण ऑपसेट, १०३-१०८




**श्रीमती शशिकला दोधू सोनवणे**
**संशोधक , विद्यावाचस्पती विद्यार्थी ,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगांव.**

LBP PUBLICATION